मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता.वसई, जि.पालघर-४०१३०५

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
इमेल : vasaivirarcorporation@gmail.com
जावक क्र.: व.वि.श.म./अनबा/ २७७७/२०२४-२५
दिनांक : २७/ ११ /२०२४

# प्रेस नोट

**वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'डी' मधील गाव मौजे आचोळे सर्वे नं. २२ ते ३२ व ८३ मधील विकास आराखडयातील आरक्षित भुखंडावरील अनाधिकृत बांधकामावर कारवाई बाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'डी' मौजे आचोळे सर्वे नं. २२ ते ३२ व ८३ मधील "डंपिग ग्राऊंड व मलजल प्रक्रिया केंद्र (STP)" साठी आरक्षित असलेल्या आरक्षित भुखंडावर सन २०१० पूर्वी तत्कालिन सिडको नियोजन प्राधिकरणाच्या कार्यकाळात बांधलेल्या ४१ अनाधिकृत इमारतीवर मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१५८५३/२०२२ दाखल करण्यात आलेली होती. मा.उच्च न्यायालयाने दि.०८/०७/२०२४ रोजीच्या आदेसानुसार तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र.४५०५२/२०२४ मधील दि.०१/१०/२०२४ रोजी निष्कासनाचे निर्देश दिलेले आहेत.

सदर ठिकाणी राहणाऱ्या रहिवाश्यांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, मा.उच्च न्यायालय, मुंबई व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने निष्कासनाची कारवाई दि.२८/११/२०२४ रोजी पासुन करण्यात येणार असुन आपण सदर इमारती लवकरात लवकर खाली करुन वसई विरार शहर महानगरपालिकेला सहकार्य करावे.

सदरील जे सदनिकाधारक विहित पुरावा सादर करतील त्यांना वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

तरी संबंधित इमारतीमधील रहिवाशांना वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत आवाहन करण्यात येत आहे की, आपल्या सदनिका तात्काळ रिकाम्या करण्यात येऊन वसई विरार शहर महानगरपालिकेस सहकार्य करावे आणि त्याचे प्रमाणपत्र मिळणेकामी सर्व संबंधित कागदपत्रासह वसई विरार शहर महानगरपालिकेचे प्रभाग समिती 'डी' कार्यक्षेत्रातील सहा.आयुक्त यांच्याशी तसेच क्षेत्रीय उपायुक्त संपर्क साधावा.

(सुभाष जाधव)
उपायुक्त परिमंडळ -३
वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned with CamScanner